**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेला “आभासी वैयक्तिक ठेव लेखा” कार्यपध्दतीमधून सूट देण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन

**नियोजन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : सारथी २०२४/प्र.क्र.२०१(२)/का.१४२५-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ जानेवारी, २०२५

<u>वाचा</u> :- शासन निर्णय,वित्त विभाग क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५ दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४.

**<u>शासन निर्णय :</u>**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेला “मागणी क्र.ओ-२, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण,०३ मागासवर्गीयांचे कल्याण, १०२ आर्थिक विकास (०१) मराठा, कुणबी,कुणबी-मराठा, मराठा- कुणबी, (०१) (०१) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) (२२२५F५२१) कार्यक्रम " या लेखाशिर्षातर्गत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना म. को. नि. नमुना क्रमांक ४४ देयकांद्वारे राज्याच्या एकत्रित निधीतून ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) आणि ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान या उद्देश शीर्ष (Object Head) अंतर्गत आहरित केल्या जाणाऱ्या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी “आभासी वैयक्तिक ठेव लेखा” ही व्यवस्था व कार्यपध्दती लागू करण्यास दिनांक ३१ मार्च,२०२५ पर्यंत किंवा संस्थेचे आभासी वैयक्तिक ठेव लेखा खाते कार्यान्वित होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच सूट देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा शासन आदेश हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१९/२०२५/व्यय-८, दिनांक १५.०१.२०२५ व अनौपचारिक संदर्भ क्र.३०९/२०२५/कोषा.प्रशा-५,दिनांक २१.०१.२०२५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२५०१२८१६२९३४६५१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SURAJ CHAMPALAL KAKARWAL

Digitally signed by SURAJ CHAMPALAL KAKARWAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=fddb3782b6378397639ca4a904329bb3fbb1911b931b2f42a498eba21ad07417, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8CB7C061B6B41681E2CC4FFEE44245368D0F2841CCE0D8368E4D248D27B9B490, cn=SURAJ CHAMPALAL KAKARWAL
Date: 2025.01.29 11:27:59 +05'30'

**( सु.चं.काकरवाल )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे-४११ ००१.
२. उपसचिव/सहसचिव,वित्त विभाग (व्यय-८,कोषा.प्रशा.५)
३. संचालक,लेखा व कोषागारे संचनालय,मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई /जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
५. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
६. निवडनस्ती- का.१४२५-अ.